# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

सुर्यकांत वगळ प्रसुतीगृह

क्र.एचओ/ १७२ /एसव्हीएमएच दि.०८.०६.२०२६

**स्वारस्य अभिव्यक्ती जाहीरात**

विषय:- सी विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत सुर्यकांत वगळ प्रसूतिगृह झावबावाडी येथे सोनोलॉजिस्ट यांची पॅनलवर निवड करण्याबाबत...

सी विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत सूर्यकांत वगळ प्रसूतिगृह झावबावाडी येथील प्रसुतीसाठी दाखल झालेल्या आंतररूग्णांच्या सोनोग्राफीसाठी सोनोलॉजिस्ट पॅनलवर निवड करण्याकरिता इच्छूक सोनोलॉजिस्ट यांची परिपत्रक क्र. एचओ / १९८१६ / आस्था.-२ दि. १३.१२.२०२५ अन्वये खाली नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता तसेच अटी व शर्तीनुसार सोमवार ते शुक्रवार (साप्ताहिक सुट्टी व सार्वजनक सुट्टी वगळून) सकाळी १०.०० वा. ते सायंकाळी १८.०० वा. पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता:

| | |
|---|---|
| १ | उमेदवार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी / पदविका / डीएनबी धारण करणारा असावा. |
| २ | पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर १ वर्षाचा अनुभव धारण करणारा असावा. |
| ३ | महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र तसेच नुतणीकरण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक. |
| ४ | अतिरिक्त अर्हतेचे महाराष्ट्र कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र / नुतणीकरण आवश्यक. |

सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती:

| | |
|---|---|
| १ | सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांची वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत राहिल. |
| २ | प्रत्येक प्रसूतिगृहात सोनोलॉजिस्ट पॅनेलमध्ये कमीत कमी दोन तज्ञ असावेत. |
| ३ | बधिरिकरणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांना चक्रांकीत पध्दतीने शस्त्रक्रीयेकरिता बोलाविण्यात यावे. |
| ४ | बधिरिकरणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांचे राहण्याचे ठिकाण हे प्रसूतिगृह/रूग्णालयापासून शक्यतो जवळ असावे. |

<u>सोनोलॉजिस्ट पॅनल मानधन तक्ता</u>

| अ. क्र. | सुविधेचे नाव | प्रस्तावित मानधन |
|---|---|---|
| १ | सोनोलॉजिस्ट सेवा (सर्वसाधारण सोनोलॉजी) | प्रत्येक सोनोग्रॉफी करिता रु. २५०/- |
| २ | सोनोलॉजिस्ट सेवा (अनमोली स्कॅन / कलर डॉपलर / २ डी एको) | प्रत्येक स्कॅन करिता रू. ५००/- |

उपरोक्त नमूद अटी व शर्ती पुर्ण करणा-या इच्छूक सोनोलॉजिस्ट यांनी वैद्यकीय अधिकारी, सुर्यकांत वगळ प्रसुतीगृह यांच्या नावे स्वहस्ताक्षरात आपले अर्ज व कागदपत्रेसह सुर्यकांत वगळ प्रसूतिगृह झावबावाडी येथील कार्यालयात मंगळवार ते शुक्रवार दि.०९.०६.२०२६ ते दि.१२.०६.२०२६ पर्यंत सकाळी १०.०० वा. ते सायंकाळी १८.०० वा. पर्यंत या वेळेत (साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी वगळून) जमा करावे.

कार्यालयाचा पत्ता:
वैद्यकीय अधिकारी,
सुर्यकांत वगळ प्रसुतीगृह,झावबावाडी,
ठाकुरद्वार,मुंबई – 400002.